नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २७६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# IIT मुंबईमध्ये मोठ्या घडामोडी

## तीन दिवसांच्या आंदोलनात १८ मागण्या मान्य, संचालक राजीनामा देणार!



### संचालक आज राजीनामा देणार

प्रस्तावित सुधारणा एका महिन्यात लागू न झाल्यास संस्था संचालकांनी राजीनामा द्यावा, असंही विद्यार्थ्यांनी म्हटले आहे. तर, शिरीष केदारे आज स्वतःहून राजीनामा देण्याची शक्यता आहे. "मी सोमवारी राजीनामा देणार आहे", असं ते एका व्हायरल व्हिडिओमध्ये बोलताना दिसले.

**मुंबई : (स. गांवकरी)**

परीक्षेत कॉपी केल्याचा आरोप झाल्याने आयआयटी मुंबईतील विद्यार्थी साहिल वाकोडे याने शुक्रवारी आत्महत्या केली. यानंतर विद्यार्थ्यांनी सलग तीन दिवस कॉलेज कॅम्पसमध्ये धरणे आंदोलन दिल्याने आयआयटी मुंबई प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या १८ कलमी मागण्या मान्य केल्या आहेत. तसंच, संस्थेचे संचालक शिरीष केदारे हेही आज राजीनामा देण्याची शक्यता आहे. या कराराचा तपशील सोमवारी एका खुल्या बैठकीत (ओपन हाऊस) विद्यार्थ्यांसमोर अधिकृतपणे ठेवला जाईल, त्यानंतर आंदोलक विद्यार्थी त्यांचे आंदोलन सुरू ठेवायचे की नाही याचा निर्णय घेतील. मुख्य प्रवेशद्वाराजवळ धरणे धरून बसलेले विद्यार्थी आणि आयआयटी-मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे व इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्यात झालेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर हा तोडगा निघाला. संस्थेने या कराराबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली, तरी या बैठकीच्या लाइव्ह स्ट्रीममध्ये संचालक विद्यार्थ्यांच्या १८ कलमी मागण्यांच्या पत्रावर स्वाक्षरी करताना दिसले. साहिल परीक्षा देत असताना तिथे पर्यवेक्षक म्हणून काम करणारे प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांना तातडीने निलंबित करावे, ही विद्यार्थ्यांची मुख्य मागणी होती. साहिलच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे नोंदवण्यात आलेल्या एफआयआरमध्ये प्रा. दुल्ला यांचे नाव आहे. त्यांच्या निलंबनाच्या मागणीवर प्रा. केदारे लाइव्ह स्ट्रीममध्ये "आम्ही नियमानुसार प्रक्रिया पूर्ण करू", असं सांगताना दिसले. साहिलच्या मृत्यूच्या परिस्थितीची स्वतंत्र चौकशी व्हावी, ज्याचा अंतरिम अहवाल ३० सप्टेंबरपर्यंत आणि अंतिम अहवाल १५ ऑक्टोबरपर्यंत सादर केला जावा; संचालक, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता आणि एनर्जी सायन्स विभागाच्या प्रमुखांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत २२ सप्टेंबरपर्यंत खुली बैठक घेतली जावी.



**मुंबई :** मुंबईतील कोस्टल रोडवर रविवारी पहाटे भीषण अपघात झाला. पहाटे सुमारे ५.०३ वाजण्याच्या सुमारास काळ्या रंगाची BMW कार (क्रमांक DD 01 C 6302) मरीन ड्राईव्हहून हाजी अलीच्या दिशेने जात होती. लाला कॉलेजसमोर, लोटस जेट्टीजवळील कोस्टल रोडवरील ब्रिजच्या कठ्ठ्यावरून ही कार खाली पडली. पार्किंगचे काम सुरू असलेल्या परिसरात हा अपघात झाला. या दुर्घटनेत कारमधील चार जण जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यापैकी तीन जणांना मृत घोषित केले, तर एका जखमीवर उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये धैर्य दर्शन शेठ (१७), आदित्य जकासनीया (१९), शनय गजर (२१) तर जखमी आदित्य कल्पेश्वर ओसवाल (२३) असून घटनेची माहिती मिळताच ताडदेव पोलीस ठाण्याचे अधिकारी व पथक घटनास्थळी दाखल झाले. अपघाताच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू असून, पोलिसांकडून पुढील चौकशी केली जात आहे.

## थोडक्यात...

### 'महामदत'चा खोळंबा

छत्रपती संभाजीनगर (स. गांवकरी) : दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रक्रियेतील द्राविडी प्राणायम पूर्ण करण्यासाठी आवश्यक आकडेवारी ज्या महामदत पोर्टलवरून उपलब्ध होत असे ते पोर्टल सध्या बंद आहे. वनस्पती फरक निर्देशांक, जमिनीतील ओलावा आदींबाबतची ही आकडेवारी राज्यस्तरावरून उपलब्ध झाल्यानंतरच दुष्काळ जाहीर करण्याचा दुसरा टप्पा पूर्ण होईल. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून कोरडवाहू शेतीसाठी प्रतिहेक्टर मिळणारी रक्कम ८५०० रुपये एवढी असेल. म्हणजे प्रति गुंठा केवळ ८५ रुपये. या निकषात आता तातडीने बदल करावेत, अशी मागणी होऊ लागली आहे. महागाई निर्देशांक आणि शेती संकटाची वारंवारिता याचा विचारही सरकारने करावा, अशी विनंती केली जात आहे. २०१६ ते २०२६ या कालावधीमधील वाढलेले खताचे भाव तरी सरकारने विचारात घ्यावेत, अशी मागणी केली जात आहे. तीन ते चार आठवड्यांच्या पावसाच्या खंडाचा दुष्काळाचा पहिला निकष अनेक तालुक्यांना लागू होतो. मराठवाड्यातील सहा तालुक्यांमध्ये सप्टेंबरअखेर २५ ते ५० टक्केच पाऊस नोंदविण्यात आला. तर ४१ तालुक्यांत ५० ते ७५ टक्के पाऊस पडला आहे. ७६ पैकी ४० तालुक्यांत आणि ५११ महसूल मंडलात २० ते ३० दिवसांचा खंड पडल्याने पिकांची स्थिती आहे. ६० महसूल मंडलात ३० दिवसांपेक्षा अधिकचा पावसाचा खंड आहे.

### स्टँडअप कॉमेडीच करावी : फडणवीस

नागपूर (स. गांवकरी) : मध्यप्रदेशातील इंदूर येथे आयोजित 'छात्रों की गूंज' या विशेष कार्यक्रमातून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनी शनिवारी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राहुल गांधी मंचावर उपस्थित असतानाच स्टँडअप कॉमेडियन पुलकित मणीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बोलण्याच्या आणि वागण्याच्या पद्धतीची नक्कल करीत स्टँड़अप कॉमेडीचा प्रकार केला. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी नागपुरात राहूल गांधी यांना टोला लगावला. नागपूर, बुटीबोरी येथे उद्योजकांसोबत संवाद पार पडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमासोबत संवाद साधला. यावेळी माध्यमांनी राहूल गांधी यांच्या शनिवारी झालेल्या कार्यक्रमाकडे लक्ष वेधले असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मला वाटते की आता राहुल गांधींकडे हेच काम शिल्लक आहे. त्यांनी स्टँड अप कॉमेडीचे काम हाती घेतले आणि मिमिक्री केली तर त्यांना चांगला रोजगार मिळू शकेल.

## आदिवासी आश्रमशाळांमध्ये दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

### केंद्रीय चौकशीची खासदार भगरे यांची मागणी

**नाशिक : (स. गांवकरी)**

महाराष्ट्रातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये गेल्या दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची केंद्र सरकारच्या स्तरावर स्वतंत्र व उच्चस्तरीय केंद्रीय चौकशी समिती नियुक्त करून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे यांनी केंद्रीय आदिवासी कार्यमंत्री जुआल ओराम यांच्याकडे केली आहे. राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील सरकारी व अनुदानित आश्रमशाळांमध्ये २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. यामध्ये सरकारी आश्रमशाळांतील ३८४, तर अनुदानित आश्रमशाळांतील २०० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मृत्यूची कारणे विविध स्वरूपाची असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. आदिवासी विद्यार्थी दुर्गम व आर्थिकदृष्ट्या मागास भागांतून येतात आणि शिक्षणासाठी आश्रमशाळांमध्ये निवासी




स्वरूपात राहतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य, पोषण, सुरक्षितता, स्वच्छता, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन उपचारांची जबाबदारी संबंधित यंत्रणेची आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर केवळ विभागीय चौकशी पुरेशी नसून संपूर्ण व्यवस्थेची स्वतंत्र तपासणी आवश्यक असल्याचे खासदार भगरे यांनी म्हटले आहे. केंद्रीय समितीने गेल्या दोन वर्षांतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मृत्यूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. मृत्यूचे वैद्यकीय कारण, उपचार मिळण्यास झालेला विलंब, आश्रमशाळेतील आरोग्य सुविधा, अन्न व पिण्याचे पाणी, निवासी व्यवस्था, कर्मचारी उपलब्धता आणि आपत्कालीन यंत्रणा यांचा सखोल आढावा घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.




## मागणीपत्राअभावी ६५ हजार रिक्त जागांची भरती रखडली

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून होणाऱ्या विविध पदांच्या भरती प्रक्रियेतील पेपरफुटी प्रकरणामुळे उमेदवारांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यासाठी विविध विभागातील सुमारे ६५ हजार ८६६ रिक्त पदे भरण्याच्या हालचाली सरकार दरबारी सुरु झाल्या आहेत. यातील सुमारे ४६ हजार हजार पदे लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरली जाणार आहेत. त्यासाठी सबंधित विभागांनी पदभरतीचे मागणीपत्र लवकरात लवकर सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.




राज्य लोकसवा आयोगाकडून गेल्या दोन वर्षात घेण्यात आलेल्या विविध पदभरतीच्या परिक्षांचे पेपर फुटल्यावरुन राज्यभरातील उमेदवारांनी गेल्या काही दिवसांपासून विविध ठिकाणी आंदोलन सुरु केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील आठवड्यात या आंदोलनाची दखल घेत एमपीएससीच्या राज्यभरातून आलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची भेट घेऊन त्यांच्याशी विविध मागण्यांवर चर्चा केली. राज्यात घडलेल्या पेपरफुटीच्या घटना आणि त्यानंतर विद्यार्थ्यांच्या भावनांचा झालेला उद्रेक याच्याशी सहमती दर्शवित फडणवीस यांनी पेपरफुटीची विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) माध्यमातून चौकशी करण्याची घोषणा करीत उमेदवारांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला होता. विविध कारणांनी रखडलेल्या नोकरभरतीमुळे परिक्षार्थी-उमेदवारांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यासाठी भरतीप्रक्रियेला गती देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी विविध विभागांना दिले आहेत.

गेल्याच आठवड्यात पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील पदभरती आणि रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला. सामान्य प्रशासन विभागाने रिक्त पदांबाबचे सादरीकरण करताना आजमितीस ६५ हजार ८६६ रिक्त पदे असून त्यापैकी ४६ हजार ४६४ पदे लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरावी लागणार आहेत. तर पोलिस बोर्डाकडून पोलिस शिपायांची १६ हजार ८९६ आणि पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची २ हजार ५०६ रिक्त पदे भरणे अपेक्षित आहे. राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून ४६ हजार ४६४रिक्त पदे भरणे अपेक्षित असतानाही विविध विभागांनी आयोगाकडे जेमतेम ६-७ हजार पदभरतीची मागणी नोंदविल्याची माहिती यावेळी मंत्रिमंडळास देण्यात आली. सर्वाधिक रिक्त जागा असलेल्या विभागांमध्ये प्रामुख्याने पाणीपुरवठा, वैद्यकीय शिक्षण, कृषी, महसूल, वित्त, विधी व न्याय, गृह, सार्वजनिक बांधकाम, उच्च आणि तंत्रशिक्षण तसेच सहकार या विभागांचा समावेश असून गृह विभागाने रिक्त जागांपैकी ६५ टक्के जागा भरण्यासाठी लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. पाणीपुरवठा विभागाकडे सर्वाधिक ८ हजार ६५२ रिक्त जागा असून त्यापैकी ६७ जागा भरण्यासाठी एमपीएससीला मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने ७ हजार ८६८ रिक्त पदांपैकी १० टक्के म्हणजेच ८२२ पदे भरण्यासाठी आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे. कृषी विभागातही सुमारे ६ हजार पदे रिक्त असून या विभागाचा अजून आकृतिबंधत मंजूर झालेला नाही. त्यामुळे विभागाकडून एकाही पदभरतीचा मागणी प्रस्ताव सामान्य प्रशासन किंवा आयोगाकडे दाखल झालेला नाही. महसूल विभागाने ४ हजार ७७० रिक्त पदांपैकी १७ टक्के म्हणजेच ८५२पदे भरण्याचे मागणीपत्र सादर केले आहे. अशाचप्रकारे वित्त विभागाने ३ हजार १८४ रिक्त पदांपैकी २५ टक्के-८०० पदे भरण्यासाठी मागणीपत्र दिले आहे. गृह विभागाने २ हजार रिक्त पदांपैकी १४०० (६५ टक्के) पदभरतीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तर सहकार विभागाने १२४७ पैकी ५८६ पदे भरण्यासाठी (४७टक्के) मागणी प्रस्ताव दिला आहे.

## शिक्षणसंस्थांचे आटते स्वातंत्र्य; नव्या अहवालातून विदारक वास्तवाचा वेध




**पुणे : (स. गांवकरी)**

देशातील उच्च शिक्षणाचे भवितव्य, विद्यापीठांचे गुणात्मक पातळीवरील अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते आहे. खासगी, शासकीय, अभिमत, केंद्रीय यांसह विविध प्रकारातील दीड हजारांहून अधिक विद्यापीठे, पन्नास हजारांहून अधिक महाविद्यालये हे देशातील उच्च शिक्षण व्यवस्थेचे चित्र, आकडेवारीच्या या भाषेत उत्तम म्हणावे असेच. मात्र, एखाद्या सुविधेचा किंवा यंत्रणेचा संख्यात्मक पातळीवरील विस्तार हाच फक्त यशाचा दाखला असू शकत नाही, तर त्याचबरोबर असलेल्या सुविधा वापरण्याचे नागरिकांचे स्वातंत्र्य, उभ्या राहिलेल्या यंत्रणेची शुचिता, स्वातंत्र्य आणि गुणवत्ता या सगळ्या गोष्टींवर यशाची व्याख्या ठरावी. भारतीय उच्च शिक्षणसंस्था तेथेच मार खात असल्याचे दिसते आहे. अनेक क्लृप्त्या लढवूनही अद्याप आंतरराष्ट्रीय क्रमवारीत आवर्जून उल्लेख करावा अशी कामगिरी नाही, पदवीधरांच्या फौजा लाखोंनी बाहेर पडत असल्या तरी संशोधन किंवा सक्षम मनुष्यबळ निर्मितीच्या पातळीवरही दखल घ्यावी अशी उदाहरणे मोजकीच. आतातर काय शिकवावे, कुणी शिकवावे, कुणी शिकावे, कसे शिकवावे आणि शिकावे याचे शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्यही आटत चालल्याचे दिसते. भारतीय समाजाच्या, पुढील पिढ्यांच्या ऱ्हासाची ही नांदी आता अधिक कर्कश होत चालली आहे. याची जाणीव अधिक तीव्रतेने होण्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षण संस्थांच्या स्वातंत्र्याचा लेखाजोखा मांडणारा नुकताच आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झालेला अहवाल. या अहवालाचा मथळाच 'फ्री टू थिंक' असा आहे. अमेरिकास्थित, परंतु जगभरातील अनेकांचा सहभाग असणारा 'स्कॉलर्स अॅट रिस्क' हा गट गेली दहा वर्षे अशा स्वरूपाचा अहवाल प्रसिद्ध करतो.



**चितळवेढे येथे गणपती बाप्पांची आरती करताना डॉ. विश्वासराव आरोटे!**

अकोले तालुक्यातील चितळवेढे येथील गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित गणपती बाप्पांच्या आरतीप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित राहून गणरायाची आरती केली.

# सबला उत्कर्ष फाउंडेशनला ‘नमो सेवा सन्मान-२०२६’ने गौरव!

■ नवी दिल्लीतील ‘एक शाम मोदी जी के नाम’ कार्यक्रमात सामाजिक कार्याची दखल!

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय नमो संघाच्या (BNMS) वतीने नवी दिल्ली येथील एनडीएमसी कन्व्हेन्शन सेंटर, संसद मार्ग येथे ‘एक शाम मोदी जी के नाम’ तसेच ‘नमो सेवा सन्मान-२०२६’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय नमो संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मन्नू सिंह तोमर होते. देशभरातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, अधिकारी तसेच विविध सेवा क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पडेगाव येथील सबला उत्कर्ष फाउंडेशनला सामाजिक सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘नमो सेवा सन्मान-२०२६’ प्रदान करण्यात आला. फाउंडेशनच्या वतीने श्रीमती राजश्री चौधरी यांच्या नावाने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान फाउंडेशनच्या वतीने श्री. हर्ष श्रीवास्तव यांनी स्वीकारला.



‘नमो सेवा सन्मान-२०२६’ मिळाल्याने सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. हा सन्मान सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी प्रेरणादायी असून भविष्यातही महिला, दिव्यांग, गरजू तसेच समाजातील विविध घटकांसाठी सेवा कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या उत्थानासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन, सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान, वृक्षारोपण, गरजू व अनाथ मुलांना मदत, ‘बेटी बचाओ-बेटी पढाओ’सह विविध सामाजिक जनजागृती उपक्रमांमध्ये संस्थेचा सहभाग राहिला आहे. तसेच महिला व दिव्यांगांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने FlavorCrest Masala रोजगार उपक्रम सुरू करण्यात आला असून, त्यातून रोजगार व स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ‘नमो सेवा सन्मान-२०२६’ कार्यक्रमात सामाजिक सेवा तसेच विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. भारतीय नमो संघ वर्ष २०१२ पासून सामाजिक सेवा क्षेत्रात कार्यरत असून सेवा, सामाजिक जबाबदारी आणि समाजहिताचे उपक्रम पुढे नेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांवर कार्यशाळा उत्साहात संपन्न

पुणे : (स. गांवकरी)



■ एससीईआरटी महाराष्ट्र आणि स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशन पुणे यांचा पुढाकार

राष्ट्रीय व्यावसायिक मानकांविषयी शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणात त्यांची क्षमता वाढवणे या उद्देशाने, १० आणि ११ सप्टेंबर रोजी पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) कॅम्पसमध्ये एका राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रभरातील जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांमधील (डीआयईटी) शिक्षक एकत्र आले होते. कार्यशाळेत एससीईआरटी महाराष्ट्राच्या जॉइंट डायरेक्टर डॉ. कमलादेवी आवटे, एससीईआरटी महाराष्ट्राच्या डेप्युटी डायरेक्टर (प्री-सर्व्हिस डिपार्टमेंट) अरुणा यादव, एससीईआरटी महाराष्ट्राचे असिस्टंट डायरेक्टर (प्री-सर्विस डिपार्टमेंट) बालकृष्ण वाटरकर तथा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनचे आयोजित करण्यात आली होती, जी व्यावसायिक विकास, संस्थात्मक बळकटीकरण आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रियेद्वारे भारताची सार्वजनिक शिक्षण प्रणाली मजबूत करण्यासाठी कार्य करते. या कार्यक्रमाने सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखडा आणि राष्ट्रीय मानके शिक्षक क्षमता, निरंतर व्यावसायिक विकास, मार्गदर्शन, मूल्यांकन आणि करिअरमधील प्रगती यांच्याशी कशी संबंधित आहेत हे समजून घेण्याची संधी दिली.

# थोडक्यात पण महत्वाचे



## किरण सूर्यवंशी यांचा आरपीआय ख्रिश्चन आघाडीत प्रवेश

पुणे (स. गांवकरी) : मुंढवा भागातील सामाजिक कार्यकर्ते किरण सूर्यवंशी यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या ख्रिश्चन आघाडीत प्रवेश केला. आरपीआयचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, शहर सचिव महिपाल वाघमारे , श्याम सडफुले, ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष ख्रिस्तोफर राजमणी, ख्रिश्चन आघाडीच्या पुणे महिला अध्यक्षा डॉर्थी थॉमस , ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहर सचिव स्टॅनली नादन, उपाध्यक्ष अरुण पवार, रणजीत शेंडगे, डेव्हिल चांडेकर यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना किरण सूर्यवंशी म्हणाले, समाजातील तळागाळातील लोकांसाठी आजपर्यंत काम करत आलो आहे. रिपब्लिकन पक्षात प्रवेश केल्याने मला एक चांगले व्यासपीठ मिळाले आहे. आमच्या भागातील गरीब, सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मला पक्षाची मदत होणार अशी भावना व्यक्त केली.

## पडघ्यात पाच दिवसांच्या गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप



भिवंडी (स. गांवकरी) : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पडघा विभागात पाच दिवसांच्या गणरायाला रविवारी भक्तिमय आणि भावूक वातावरणात निरोप देण्यात आला. ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’च्या जयघोषाने पडघा परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि गणेशभक्तांचा उत्साह यामुळे विसर्जन मिरवणुकीला भक्तीमय रंग चढला होता. पडघ्यात गणरायाचे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात आगमन झाले होते. पाच दिवसांच्या उत्सवानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी नागरिक, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. फुलांची आकर्षक सजावट, ढोल-ताशांचा निनाद आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान गणेशभक्तांनी बाप्पाच्या चरणी श्रद्धा व्यक्त करत भावपूर्ण निरोप दिला. पडघ्यातील विविध सार्वजनिक मंडळांसह अनेक घरगुती गणरायांचेही भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले.

PRAKASH RAMCHANDRA ROKADE
B.A.LL.B. ADVOCATE MOB. 9423560399 Office: B-3 Rahil Shopping Center, Nehru Bazar Junnar, Tal. Junnar, Dist. Pune. Pin: 410502.

दि. २१/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासच्या परिसरातील सर्व लोकांस व संस्थेच्या सभासदांना आमचे अशिल **मा. व्यवस्थापक राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे** यांनी समक्ष सांगितल्या वरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

**राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे** या संस्थेमध्ये श्री. आकाश सुखदेव शेलार रा. आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे यांची दि. १/०७/२०२४ पासून **दैनंदिन वसुली प्रतिनिधी** म्हणून नियुक्ती केली होती. श्री. आकाश सुखदेव शेलार यांनी आमचे अशिल संस्थेकडे **दैनंदिन वसुली प्रतिनिधी** या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचा राजीनामा आमचे अशिल संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभा दि. १९/०८/२०२६, सभा क्र. ५, विषय क्र. १४ मधील ठरावानुसार मंजूर करण्यात आला आहे.

त्यामुळे सदर जाहीर नोटीसने जाहीर करण्यात येते की,

**व्यवहारास बंदी** – श्री. आकाश सुखदेव शेलार यांच्याशी राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा पैशांचा अथवा इतर कोणताही व्यवहार करू नये.

**जबाबदारी** – या नोटीसच्या दिनांकानंतर तसेच दि. १८/०८/२०२६ नंतर जर कोणीही श्री. आकाश सुखदेव शेलार यांच्याशी राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या नावावर पैशांची देवाण-घेवाण किंवा कोणताही व्यवहार केला, तर त्याला आमचे अशिल संस्था जबाबदार राहणार नाही. अशा व्यवहारांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील.

**अधिकृत आवाहन** – राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे या संस्थेच्या सर्व दैनंदिन ठेव / मुदत ठेव सभासद व कर्जदारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपली दैनंदिन ठेव / मुदत ठेव किंवा कर्जाचे हप्ते संस्थेच्या आळेफाटा शाखेत येऊन थेट जमा करावी किंवा संस्थेने नियुक्त केलेल्या नवीन अधिकृत प्रतिनिधीकडेच रीतसर पावती घेऊन जमा करावी.

सदर जाहीर नोटीस संस्थेचे हित आणि सभासदांच्या सुरक्षेसाठी तसेच कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून प्रसिद्ध केली असे.

**येणेप्रमाणे जाहीर नोटीस**

**जुन्नर, दि. २१/०९/२०२६.**

**मा. व्यवस्थापक राहुल अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी. लि. मुंबई, शाखा आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे तर्फे**

**ॲडव्होकेट .......ॲड. प्रकाश रामचंद्र रोकडे, ऑफिस नं. बी-३, तळमजला, राहिल शॉपिंग सेंटर, नेहरू बाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. मो.नं. ९४२३५६०३९९.**

# पत्रकार सगीर शेख यांचा जाहीर सत्कार



खर्डी : (स. गांवकरी)

रविवार, २० सप्टेंबर रोजी नाशिक येथे जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे दुसरे राज्यव्यापी अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनाच्या निमित्ताने शहापूर तालुक्यात सातत्याने पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले पत्रकार सगीर शेख यांचा संघटनेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. शहापूर तालुक्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,ग्रामपंचायत, नागरिकांच्या समस्या तसेच स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या विषयांना पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने प्रसिद्धी देण्याचे काम पत्रकार सगीर शेख करत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले आहेत. याच कार्याची दखल घेत जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या दुसऱ्या राज्यव्यापी अधिवेशनात पत्रकार सगीर शेख यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रकाश धाबे तसेच पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष अंबादास चिकणे यांचाही सत्कार करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या पत्रकारांच्या उपस्थितीत झालेल्या या सत्कारामुळे पत्रकार सगीर शेख यांना पुढील पत्रकारितेच्या कार्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

# येरवडा खुल्या कारागृहात बाप्पांचे आगमन

## ‘कैलास पर्वता’चा नयनरम्य देखावा, रफी म्युझिकल ग्रुपच्या सुरांनी बंदीवान मंत्रमुग्ध

पुणे : (स. गांवकरी)



येरवडा खुले कारागृहात यंदाचा गणेशोत्सव उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदीवानांनी एकत्र येत श्री गणेशाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली. कारागृहाच्या सांस्कृतिक भवनात भगवान शंकर आणि कैलास पर्वतावर आधारित आकर्षक रोषणाईसह नयनरम्य देखावा साकारण्यात आला असून, तो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

गणेशोत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कारागृहाला भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. १५ सप्टेंबर रोजी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, पुणेचे अध्यक्ष तथा निवृत्त न्यायाधीश अशोक भिल्लारे यांनी, तर १६ सप्टेंबर रोजी मुख्यालय सदर्न कमांड, पुणे येथील कमांड सायबर ऑपरेशन्स सपोर्ट विंगचे कर्नल आशिष सुतार यांनी उत्सवस्थळी भेट दिली. दोन्ही मान्यवरांनी श्री गणरायाची आरती करून उपस्थित बंदीवानांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते पुण्यातील मोहम्मद रफी म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांचे सादरीकरण. कलाकारांनी गजाननाची भक्तिगीते सादर करून संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. या संगीतमय कार्यक्रमाचा बंदीवानांनी मनमुराद आनंद घेतला. संगीताच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक ऊर्जा आणि उत्साह मिळाला. महाराष्ट्र राज्याचे महासंचालक (कारागृहे व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके, विशेष महानिरीक्षक योगेश देसाई आणि पश्चिम विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी रोप देऊन स्वागत केले. यावेळी वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भाणवसे, निशा श्रेयकर यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदीवान उपस्थित होते.

गणेशोत्सव आणि संगीतमय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्व. मोहम्मद रफी फॅन्स क्लबचे गायक मुराद काजी, कविता तरडे-फुगे, देवदत्त राजगुरू, किशोर गायकवाड, ख्वाजा शेख, संदीप काकडे, श्याम पाटील, दिगंबर गरुड, संजय सपकाळ, उर्मिला कावडे, राणी कुमारी, श्वेता देशपांडे आणि पंकज कुमार यांनी विशेष योगदान दिले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने कारागृहातील बंदीवानांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पूजा, आरती, देखावा आणि संगीताच्या कार्यक्रमामुळे येरवडा खुले कारागृहातील वातावरण सध्या भक्तिमय झाले आहे.

# पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची येरवडा पोलीस ठाण्याला भेट

## गणेशाची आरती करून नागरिकांशी साधला मनमोकळा संवाद; येरवडा पोलिसांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक

पुणे : (स. गांवकरी)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शनिवारी रात्री ११ वाजता येरवडा पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील श्री गणेशाची आरती करून उपस्थित नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. पोलीस आयुक्तांच्या या अनौपचारिक भेटीमुळे उपस्थित नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



पोलीस आयुक्त अमितेश कुमार येरवडा पोलीस ठाण्यात येणार असल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच विघ्नहर्ता ट्रस्टचे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित झाले. गणेशाची आरती झाल्यानंतर पोलीस आयुक्तांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत परिसरातील विविध प्रश्न आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या.

यावेळी डीजेमुक्त दहीहंडी तसेच ईद-ए-मिलादचा सण शांततामय आणि सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यासाठी नागरिकांची सर्वसमावेशक सहमती मिळवून घेतल्याबद्दल येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अभिनंदन केले. सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांसोबत नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, कल्याणीनगर परिसरात ध्वनी प्रदूषणाविरोधात जनजागृती तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मोनिका शर्मा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी येरवडा पोलिसांच्या कार्याचे कौतुक करणारा हस्तलिखित शुभेच्छा संदेश तयार केला होता. हा संदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रदान करण्यात आला.

सामान्य नागरिकांमध्ये सहजपणे मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर कायदेशीर आणि प्रभावी उपाययोजना करणे तसेच नागरिकांचा विश्वास संपादन करून लोकाभिमुख पद्धतीने काम करण्याच्या येरवडा पोलिसांच्या कार्यपद्धतीचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.

‘नागरिकांचा विश्वास, पोलिसांचा सेवाभाव आणि कायद्याचा सन्मान’ या त्रिसूत्रीच्या माध्यमातून येरवडा पोलीस ठाण्याची लोकाभिमुख वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहावी, अशा शुभेच्छांसह भेटीची सांगता झाली.

# योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे

## उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन




लोणावळा : (स. गांवकरी)

“भूतकाळातील चांगल्या प्रथा आणि परंपरा भावी पिढ्यांसाठी जतन केल्या पाहिजेत. व्यक्तीच्या अंतर्मनातील संतुलन आणि जगाशी सुसंवाद साधण्याची शिकवण देणारा योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे,” असे प्रतिपादन भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. कैवल्यधामच्या गोरधनदास सेक्सारिया कॉलेज ऑफ योग अँड कल्चरल सिंथेसिसच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित अमृत महोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. योग शिक्षण, संशोधन आणि योग शिक्षक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात महाविद्यालयाने दिलेल्या ७५ वर्षांच्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. उपराष्ट्रपती राधाकृष्णन म्हणाले, “बदल हा निरंतर होत असतो. मात्र, भूतकाळातील सर्व चांगल्या प्रथा भविष्याच्या पिढ्यांसाठी जतन करणेही आवश्यक आहे. त्या अर्थाने योग केवळ एका पिढीपुरता मर्यादित नाही. योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे.

# गणेशोत्सवाच्या देखाव्यातून ‘हरित शहरा’चा संदेश

## अभियंता विजय मोराळेंचा अभिनव उपक्रम : आधुनिक शहर नियोजनासोबत पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम; ‘विकास करा, मात्र निसर्गाला सोबत घेऊन’चा संदेश

पुणे : (स. गांवकरी)

गणेशोत्सव म्हटले की आकर्षक सजावट, रोषणाई आणि विविध विषयांवरील देखावे पाहायला मिळतात. मात्र, पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि आधुनिक शहर नियोजनाचा सुंदर संगम घडवून आणणारा अनोखा देखावा युवा उद्योजक व अभियंता विजय मोराळे यांनी साकारला आहे. गणेशोत्सवानिमित्त त्यांच्या अभियांत्रिकी व बांधकाम क्षेत्रातील कार्यालयात पर्यावरणपूरक गृहसंकुलाचा देखावा उभारण्यात आला असून, त्यातून ‘विकास करा; मात्र निसर्गाला सोबत घेऊन’ हा संदेश देण्यात आला आहे.



गेल्या दशकभरापासून बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या विजय मोराळे यांच्या समूहाने आतापर्यंत विविध गृहसंकुले उभारली आहेत. बांधकाम क्षेत्रातील या अनुभवातून ‘सुंदर शहर, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकास’ ही संकल्पना गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडण्यात आली आहे. या देखाव्यात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, निवासी इमारती, बंगले तसेच आधुनिक शहरासाठी आवश्यक असलेल्या विविध सुविधांचे आकर्षक लघुरूप साकारण्यात आले आहे. विशेष म्हणजे शहराच्या विकासासोबत झाडे, हिरवाई आणि स्वच्छ पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

शहरांचा झपाट्याने होणारा विस्तार आणि त्यासोबत निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या लक्षात घेता, आधुनिक शहर उभारताना निसर्गाचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. ‘विकास हवा, पण निसर्गाच्या सोबतीने’ हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांनी केवळ देखाव्याच्या सजावटीचे कौतुक न करता त्यामागील पर्यावरणपूरक विचार समजून घ्यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि सकारात्मक विचार मांडण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे या उपक्रमातून दाखवून देण्यात आले आहे. ‘विकास करा; मात्र निसर्गाला सोबत घेऊन करा’ या विचारातून साकारलेल्या या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या देखाव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## उत्तम जानकरांची वाढतेय भाजपशी जवळीक?

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात उत्तमराव जानकर आणि मोहिते-पाटील यांच्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदलाचे संकेत दिसू लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूंमध्ये मतभेद उघड झाले होते. जानकरांनी मोहिते-पाटलांवर उमेदवारीच्या मुद्द्यावर विश्वासघाताचा आरोप करत महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता. या पार्श्वभूमीवर आता जानकरांची भाजप नेत्यांशी वाढती जवळीक राजकीय चर्चेचा विषय ठरत आहे. माण तालुक्यातील बोराटवाडी येथे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निवासस्थानी विराजमान असलेल्या श्री गणरायाची उत्तमराव जानकर यांनी आरती केली. यावेळी भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांचीही उपस्थिती होती. गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर जानकर यांनी सोलापूर जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने पिकांवर निर्माण झालेल्या संकटाबाबत पालकमंत्री गोरे यांच्याशी चर्चा केली. दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळावी, तसेच माळशिरस तालुक्यातील लोडशेडिंगचा प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. विधान परिषद निवडणुकीनंतर जानकरांनी महायुतीच्या बैठकीला उपस्थित राहून भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता. त्यानंतर सोलापूरच्या राजकारणात त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत चर्चा सुरू झाली आहे. मात्र, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निवासस्थानी गणरायाची आरती करणे हे राजकीय आघाडी किंवा पक्षप्रवेशाचे अधिकृत संकेत आहेत, असे या भेटीवरून निश्चितपणे म्हणता येणार नाही. ही भेट सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे दीड महिन्याच्या बाळाचा मृत्यू

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर येथील श्री मार्कंडेय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या दीड महिन्याच्या बाळाचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणा मुळे मृत्यू झाला असल्याचा खळबळ जनक प्रकार घडला असून या रुग्णालयावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सोलापुरातील नागरिकांनी आणि मृत बाळाच्या नातेवाईकांनी केली आहे. येथील श्री मार्कंडेय रुग्णालयात दीड महिन्यांच्या चिमुरड्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्यामुळे मोठी खळबळ उडाली असून डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे बाळाचा मृत्यू झाला असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. डॉक्टर वेळेवर आले नाहीत. बाळा ला फक्त सर्दी झाली होती म्हणून बाळास रुग्णालयात दाखल केल्या नंतर डॉक्टरांनी नीट काळजी घेतली नाही.बाळाकडे लक्ष दिले नाहीत. दवाखान्यात ॲडमिट केल्यावर लगेच एका दिवसात बाळाचा मृत्यू झाला आहे. असा आरोप त्यांनी केला आहे. सोलापुरात मार्कंडेय या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या अवघ्या दीड महिन्यांच्या चिमुरड्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आल्या नंतर सोलापुरात मोठी खळबळ उडाली आहे. . रुग्णालय प्रशासनाचा निष्काळजीपणा आणि डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आपल्या मुलाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे. श्रीनाथ विकी मंजूळकर असे मृत बालकाचे नाव आहे. श्रीनाथला सर्दीचा त्रास असल्याने शनिवारी दिनांक 19 सप्टेंबर 2024 रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्याला मार्कंडेय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासणीनंतर रक्त तपासणीसाठी रक्त काढत असताना बाळ जोरजोराने रडत होते. मात्र, त्यानंतर अचानक बाळ शांत झाले आणि कोणतीही हालचाल दिसत नसल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. डॉक्टरांना बोलावूनही सुमारे १५ मिनिटे जबाबदार डॉक्टर उपस्थित झाले नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. त्यानंतर बाळाला आयसीयू मध्ये दाखल करण्यात आले परंतु तो पर्यंत बाळ मरण पावले होते असे नातेवाईकांनी सांगितले.

## ठाणे महापालिका क्षेत्रात १६०५३ गणपतींचे तर १०३९ व गौरींचे विसर्जन



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सहाव्या दिवशी नागरिकांनी भक्तिमय वातावरणात गणपती व गौरींच्या मूर्तींचे विसर्जन केले. महापालिकेने विविध विसर्जन घाटांवर केलेल्या नियोजनानुसार एकूण १६ हजार ०५३ गणपती मूर्तींचे तसेच १ हजार ०३९ गौरी मूर्तींचे विसर्जन झाले. गणपती व गौरींच्या एकूण १७ हजार ०९२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गणपती मूर्ती विसर्जनाचा प्रभाग समितीनिहाय आढावा- उथळसर येथे ६१२, नौपाडा-कौपरी येथे २ हजार ८०९, कळवा येथे २ हजार ४९१, दिवा येथे ८२९, मुंब्रा येथे ३४८, माजिवडा-मानपाडा येथे ३ हजार ७५८, लोकमान्य-सावरकर येथे २३०, वागळे येथे २ हजार ७४९ आणि वर्तकनगर येथे २ हजार २२७ गणपती मूर्तींचे विसर्जन झाले. तर सर्व प्रभाग समिती मिळून १०३९ गौरींचे विसर्जन करण्यात आले. गणपती विसर्जनासाठी टँक विसर्जन व्यवस्था, मूर्ती स्वीकृती व्यवस्था, कृत्रिम तलाव, खाडी घाट तसेच फिरती विसर्जन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली होती. या विविध व्यवस्थांच्या माध्यमातून नागरिकांना सुलभ व सुरक्षित विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. गणपती विसर्जनाच्या एकूण १६ हजार ०५३ मूर्तींपैकी ३ हजार ७२६ मूर्तींचे टँक विसर्जन व्यवस्थेद्वारे, १५८ मूर्तींचे मूर्ती स्वीकृती व्यवस्थेद्वारे, १० हजार २०७ मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये, १ हजार ९३८ मूर्तींचे खाडी घाटावर, तर २४ मूर्तींचे फिरती विसर्जन व्यवस्थेद्वारे विसर्जन करण्यात आले.

## तामसा येथे गणपती विसर्जनाला दुष्काळाचे सावट; प्रशासन मात्र झोपेत

तामसा (स. गांवकरी) : गणेशोत्सवाची सांगता अवघ्या काही दिवसांवर आली असताना तामसा शहरात गणपती विसर्जनाच्या नियोजनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यंदा परिसरात दुष्काळी परिस्थितीचे सावट असल्याने नेहमीच्या विसर्जन खदानींमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. त्यातच मिरवणूकीचा मार्ग खड्डेमय व अरुंद असल्याने मोठ्या गणेशमूर्तींची सुरक्षितपणे मिरवणूक काढून विसर्जन करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. मात्र, अद्याप प्रशासनाकडून ठोस नियोजन दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तामसा शहरातील विविध गणेश मंडळांकडून दरवर्षी मोठ्या आकाराच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते. यंदाही काही मंडळांनी १५ ते १७ फूट उंचीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. मात्र, विसर्जनासाठी वापरल्या जाणाऱ्या खदानींमध्ये अल्प प्रमाणातच पाणी असल्याने एवढ्या मोठ्या मूर्तींचे विसर्जन कसे करायचे, असा गंभीर प्रश्न मंडळांसमोर उभा राहिला आहे. मोठ्या गणेशमूर्ती पाण्यात व्यवस्थित विसर्जित करण्यासाठी पुरेशी खोली व योग्य व्यवस्था आवश्यक असते. मात्र, खदानीमध्ये पाणी कमी असल्यास मूर्ती खाली नेताना तळाला आदळून मूर्ती खंडित होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

# इंद्र देवाला सत्य परिस्थिती सांगणारा देव जोकमार

सोलापूर : (स. गांवकरी)

गौरी आणि गणपती यांच्या सणामध्ये ग्रामीण भागांत मोठा उत्साह असतो अगोदर गणपती येतात नंतर गौरी चे आगमन होते या दोन्ही देवांचा मोठा पाहुचार केला जातो सर्व काही गणपती आणि गौरी यांना पुरविले जाते, उत्सव काळात त्यांचे सर्व प्रकारची सेवा करत त्यांना सर्व प्रकारचे नैवद्य पुरविले जाते. हे सगळे करण्याचे कारण म्हणजे या मागची आख्यायिका वेगळी सांगितली गेली आहे. गौरी आणि गणपती ला आनंदी ठेवून त्यांचा मोठा पाहुणचार करून त्यांना पाठवले तरच पाऊस पाणी,पिक पाणी चांगले येईल अशी आख्यायिका आहे. म्हणून गौरी गणपतीची मोठी बडदास्त केली जाते. तरीही इंद्र देवाकडे गणपती सगळे काही खोटे सांगत जातो असे म्हणतात तर गौरी त्यांना सगळे काही मनमुराद पुरवून



देखील देवाकडे भू तलावर जनतेचे जनावरांचे फार हाल होत आहेत पाऊस नाही खायला अन्न धान्य नाही. असा निरोप देतात. गौरी गेल्यावर भूतलावर ची पाहणी करण्यासाठी येणारा देव म्हणजे, जोकमार . हा जोकमार सगळे काही सत्य सांगतो.



भू तलावर पाणी नाही पाऊस नाही जनतेचे फार हाल होत आहेत. जनावरांना चारा नाही लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही मोठा दुष्काळ सुरू आहे. अशी गंभीर कहाणी आणि तक्रार इंद्र देवा पुढे जोकमार करतो, खरे सत्य जोकमार यांच्या तोंडून ऐकल्या मुळे इंद्र देव प्रसन्न होऊन पाऊस पाडायला सुरुवात करतात. आणि सृष्टी सुजलाम सुफलाम होत असते असा हा देव जोकमार खरोखर कोणताही पाहुणचार न मिळालेला साधे लोणी देखील वेळेवर न मिळालेला जोकमार हा जोकमार घरोघरी दारोदारी काही तरी द्या म्हणून फिरत असतो. तरीही लोकं त्यांना सुपात पसाभर ज्वारी देखील देत नाहीत.

> आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनात अनेक जुन्या लोकपरंपरा हळूहळू मागे पडत असताना, अशा परंपरा ग्रामीण समाजाच्या मातीशी जोडलेल्या आठवणी, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवतात.
> **- सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ते अक्कलकोट**

ग्रामीण भागातील संस्कृतीची खरी ओळख सांगणारा असा हा जोकमार आहे. जोकमार यांच्या सांगण्यावरून देव पाऊस पाडतो ही आख्यायिक ग्रामीण भागात सत्य ठरते.

ममनाबाद ता.अक्कलकोट येथील धोंडवा कोळी जोकमार घेऊन अक्कलकोटच्या बाजारात आजी आज अक्कलकोट शहरातील जुना आडत बाजार परिसरात आज ग्रामीण संस्कृतीची एक आगळीवेगळी झलक पाहायला मिळाली ममनाबाद, ता. अक्कलकोट येथील धोंडवा कोळी हे जोकमार घेऊन अक्कलकोटच्या बाजारात आले होते. यावेळी धोंडवा कोळी आजींनी सांगितले की मागील तब्बल २० वर्षांपासून जोकमार घेऊन फिरतात. आजींना पावसाबाबत विचारले असता कालपासून पावसाला सुरुवात झाली आहे आणि एक-दोन दिवसात आणखीन भरपूर पाऊस पडेल असे त्यांनी सांगितले ग्रामीण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील काही भागांत जोकमारला पाऊस, पीक-पाणी आणि समृद्धीशी जोडलेली लोकश्रद्धा मानली जाते. काही ठिकाणी जोकमाराचे मुखवटे किंवा प्रतिकात्मक रूप गावोगावी फिरवले जाते आणि चांगला पाऊस पडावा, शेती बहरावी, अशी प्रार्थना केली जाते.

## व्हीपीके पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा उत्साहात

मुदखेड : (स. गांवकरी)

मुदखेड व्हीपीके पतसंस्थेच्या २५ वर्षांच्या यशस्वी आणि गौरवशाली वाटचालीचा रौप्य महोत्सव सोहळा नांदेडातील तरोडा भागातील श्रीकृष्ण मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेला नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून तसेच संस्थेच्या २९ शाखांशी संबंधित सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्मचारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पतसंस्थेच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील विकासाची दिशा निश्चित करण्यात आली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या



विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. व्हीपीके पतसंस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी म्हणाले की, "सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाला स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम व्हीपीके पतसंस्था गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर नांदेड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सहकारी संस्था अधिक सक्षम आणि मोठ्या प्रमाणात उभ्या राहणे आवश्यक आहे." अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यावर आपला विशेष भर असल्याचे कवळे गुरुजी यांनी सांगितले.

## संतोष (शिवा) अशोक शेळके यांना गणेश महाआरतीचा मान





कोतुळ : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील कोतुळ येथील मानाचे समजले जाणारे समता प्रतिष्ठान गणेशोत्सव मित्रमंडळ, बाजारपेठ, कोतुळ यांच्या वतीने शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी गणेश महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी कोतुळ येथील नुकतेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) पदावर नियुक्त झालेले संतोष (शिवा) अशोक शेळके व शेळके परिवाराला गणेश महाआरतीचा मान देण्यात आला. यावेळी संतोष शेळके यांच्यासह नुकतीच शासकीय सेवेत निवड झालेल्या त्यांच्या भगिनी कु. पूजा शेळके, भारती शेळके तसेच सौ. वैशाली शिवा शेळके, सौ. वैजयंता शेळके, प्रथमेश राहाणे, आई सौ. शांता शेळके, वडील अशोक शेळके यांच्यासह संपूर्ण शेळके परिवार उपस्थित होता. महाआरतीनंतर समता गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शेळके परिवारातील सर्वांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, गणेशभक्त तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरती व कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी भागवत खोल्लम, सौ. खोल्लमताई, योगेश देशमुख, डॉ. अभिजित देशमुख, रवी आरोटे, बंटी देशमाने यांच्यासह मंडळाच्या सर्व सभासदांनी विशेष सहकार्य केले. गणेशभक्तीच्या वातावरणात उत्साहात हा कार्यक्रम पार पडला.

## प्रल्हाद सोनवणे राज्यस्तरीय चालकरत्न पुरस्काराने सन्मानित !

रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्ह्यातील ११ रिक्षाचालकांचा विशेष सन्मान दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने चालक दिनानिमित्त सोलापूर येथे भव्य 'चालक रत्न पुरस्कार सोहळा' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

राज्यातील २७ जिल्ह्यांमधून १२७ ऑटो रिक्षाचालकांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'चालकरत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जळगावचे प्रल्हाद भाऊ सोनवणे यांनी गेल्या तीस वर्षांपासून ऑटो रिक्षा चालक म्हणून ईमानदार कर्तव्यदक्ष आणि उत्कृष्टपणे प्रवाशांना सेवा देत आहेत . तसेच ऑटो रिक्षा चालक मालकांच्या वेदना समजून त्यांच्यासह परिवाराचा विकास व्हावा यासाठी त्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस रिक्षा युनियन जळगाव जिल्हाची स्थापना केली त्या माध्यमातून जळगाव जिल्हा व उत्तर महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा



चालकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आजही कार्य करीत आहेत. त्याची वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने दखल घेऊन प्रदेशाध्यक्ष रियाज भाई सय्यद , व प्रदेश उपाध्यक्ष इरफान शेख यांनी प्रल्हाद सोनवणे यांच्यासह जळगाव जिल्ह्यातील ११ ऑटो रिक्षाचालकांना चालकरत्न पुरस्कार सोहळ्यात विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. त्यामध्ये तन्वीर शफीउल्ला, नरेंद्र ताराचंद पाटील, शेख नबी शेख करीम कुरेशी, मुश्ताक शाह पीरन शाह, तौसिफ अहमद अल्ताफ शेख, शाम सूर्यवंशी, मुश्ताक शेख मुख्तार, प्रल्हाद भाऊ सोनवणे, प्रमोद सपकाळे, संजय एकनाथ शिंदे आणि कैलास रामचंद्र साळुंखे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाला सोलापूरचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मा. विजय पाटील, सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मा. आसिफ मुलानी, मोटार वाहन निरीक्षक गिरी, मोटार वाहन निरीक्षक झगडे, विरोधी पक्ष नेत्या वहिदा आपा, नगरसेवक जुबेर भगवान, शिवसेनेचे कार्याध्यक्ष सलाऊद्दीन, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष आबा साहेब लंगोटी, डिजिटल पत्रकार कृती समितीचे अध्यक्ष आबा साहेब लंगोटी, टायगर संघटना नांदेडचे संस्थापक अध्यक्ष अहमद भंगारवाला, वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे उपाध्यक्ष इरफान शेख आणि आझाद रिक्षा संघटना पुणेचे संस्थापक अध्यक्ष शफीक भाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मा. रियाज सैय्यद साहेब होते. यावेळी त्यांनी राज्यातील ऑटो रिक्षाचालकांच्या न्याय्य हक्कांसाठी, विविध समस्यांच्या निवारणासाठी आणि चालकांच्या हितासाठी शासन व प्रशासनाच्या दरबारी सातत्याने व प्रामाणिकपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. ऑटो रिक्षा चालकांच्या सामाजिक व व्यावसायिक योगदानाची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्यामुळे राज्यभरातील चालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## घरोघरी महालक्ष्मीचे भक्तिभावाने थाटात पूजन

तामसा : (स. गांवकरी)

सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम, उत्साह सुरू असतानाच, त्यात आनंदाची अधिकची भर घालत गुरुवारी महालक्ष्मींचे 'सुपात' आगमन झाले. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळच्या शुभ मुहूर्तावर घरोघरी विद्युत रोषणाईने आणि आकर्षक सजवलेल्या मखरामध्ये महालक्ष्मींची थाटामाटात, भक्तिभावाने स्थापना करण्यात आली. हळदी-कुंकू, बेल-फुल, अक्षदांचा मंगलमय वर्षाव करत महिलांनी महापूजा केली. पंचपक्वान्नाचा महानैवेद्य, धूपदीप , राळ अगरबत्तीच्या सुगंधात महाआरती करून महालक्ष्मींची भक्तीभावाने पूजा केली. यामुळे घरातील वातावरण अगदी प्रसन्न व प्रफुल्लित झाल्याचे पाहायला मिळाले. श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्येला झालेल्या पोळा सणानंतर दि. 14 रोजी सोमवारी गणरायाचे मोठ्या जल्लोषात आगमन झाले. १० दिवसांच्या मुक्कामावर आलेल्या गणपती बाप्पाच्या स्वागताचा जल्लोष सुरू असतानाच



महिलांना महालक्ष्मींच्या आगमनाचे वेध लागले. दि. 17 रोजी गुरुवारी सायंकाळी घरोघरी महालक्ष्मींचे सुपात आगमन झाल्यावर महिलांनी औक्षण करून त्यांचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत केले. एका आठवड्यापासूनच घरोघरी महालक्ष्मीच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू होती. धुणी-भांडी, घराची साफसफाई करून सोवळा-ओवळा करुन गौरी-गणपतीच्या पारंपरिक पद्धतीने स्वागतासाठी महिलांनी अथक परिश्रम घेतले होते. घरोघरी महालक्ष्मीचा सुंदर देखाव्यासह मखर सजवून आकर्षक साड्या, बाजूबंद, लक्ष्मीहार, सुवर्णजडीत कंबरपट्टा, सोन्याच्या दागिन्यांनी महालक्ष्मींची आरास करण्यासाठी, गौरींसमोर नानाविध देखावे, विविध प्रकारच्या खेळण्यांची खरेदीसाठी महिलांनी बाजारात झुंबड लागली होती.

# पाड्यांवरील गणरायाचे आमदार अमोल जावळे यांनी घेतले दर्शन

## आदिवासी बांधवांसोबत साधला थेट संवाद; समाधान शिबिरांतून शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्याचा निर्धार !

रावेर : (स. गांवकरी)

यावल विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे यांनी गणेशोत्सवानिमित्त सातपुडा पर्वतरांगांतील दुर्गम भागातील हरसिंग पाडा व पिंपरकुंड येथील गणेश मंडळांना भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी आदिवासी बांधवांसोबत गणेशोत्सव साजरा करून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. आमदार अमोल जावळे यांनी गणपती बाप्पाची महाआरती करून परिसरातील नागरिकांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली. यावेळी स्थानिक नागरिकांनी त्यांचे



आपुलकीने स्वागत केले.

हरसिंग पाडा परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी दैनंदिन अडचणी, मूलभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण तसेच परिसरातील विविध प्रश्नांची आस्थेने विचारपूस केली. हनुमान मंदिराच्या सभामंडपासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आमदार जावळे यांनी यावेळी दिले.

दुर्गम भागातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गारबर्डी, गारखेडा, निमड्या, सायबू पाडा, हरसिंग पाडा आणि गज्याचा पाडा येथे 'समाधान शिबिरां'चे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड, विविध शालेय दाखले तसेच अन्य आवश्यक कागदपत्रांसाठी अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून कार्यवाही केली जाणार आहे. शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, अशी भूमिका यावेळी आमदार जावळे यांनी व्यक्त केली. यानंतर आमदार अमोल जावळे यांनी पाल येथील स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसोबतच मैदानी सरावासाठी मैदानाची आवश्यकता असल्याची मागणी विद्यार्थ्यांनी यावेळी मांडली.

याची दखल घेत आमदार जावळे यांनी दादासाहेब चौधरी प्रशिक्षण संस्थेचे संचालक यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर विद्यार्थ्यांना मैदानी सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत शारीरिक सरावाचीही सुविधा मिळणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने दुर्गम पाड्यांपर्यंत पोहोचून नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि शासकीय योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेणे, यामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी गोमती बारेला, माजी जिल्हा परिषद सदस्य रामलाल बारेला, धनसिंग पवार, गाठू बारेला, इरफान तडवी, महेश बारेला, इंका बारेला, राहुल बारेला, विशाल नाईक, अनंत महाजन, राजू योतकर, बापू महाजन, सुरेश पवार, नंदकिशोर चव्हाण, राहुल धंदे, प्रवीण चव्हाण आदी उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील 13 गावांत 'एक गाव, एक गणपती'

## 174 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची ऑनलाइन नोंदणी; उत्सव काळात पोलिसांची दैनंदिन गस्त

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत यंदाच्या गणेशोत्सवात 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना १३ गावांत राबविण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना करण्यात आलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत दैनंदिन पोलीस गस्तही सुरू आहे.

ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत एकूण ३२ गावांचा समावेश आहे. ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामीण भागात परवानाधारक २५ आणि विनापरवाना ६३ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. तसेच शहरी भागात परवानाधारक ५७ आणि विनापरवाना २९ मंडळांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. अशा प्रकारे एकूण १७४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी श्री गणेशमूर्तीची स्थापना केली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी 'एक गाव, एक गणपती' उपक्रमासाठी मंडळांना आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला १३ गावांतील ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. गुंडेगाव, लालवाडी, पिंपळगाव मिश्री, पिंपळगाव निमजी, बोढार तर्फे हवेली, सिद्धनाथ, वांगी, कल्हाळ, गंगाबेट, खुपसरवाडी, धनगरवाडी, वाहेगाव आणि भनगी या गावांत 'एक गाव, एक गणपती' संकल्पनेनुसार सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमासाठी गावातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक आणि युवकांनी पुढाकार घेतला. गणेशोत्सव मंडळांनी पोलिसांकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करून उत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यावर भर दिला आहे. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गोपनीय शाखेचे अंमलदार बालाजी दंतापल्ले, बाला प्रसाद टरके तसेच होमगार्ड माधव पुयड यांनी विशेष सहकार्य केले. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून हद्दीत नियमित गस्त व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.




श्रीगोंदा : 1नोव्हेंबर 2005 पूर्वी नियुक्त व त्यानंतर 100%अनुदानावर आलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनीच पेंशन मिळावी या मागणीसाठी येत्या 28 सप्टेंबर पासून होणारे बेमुदत धरणे आंदोलन यशस्वी करण्यासाठी आज श्रीगोंदा तालुका पेन्शन पीडित बांधवांची नियोजन बैठक श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय, श्रीगोंदा (ज्ञानदीप) येथे पार पडली.

## थोडक्यात बातम्या...

### चैतन्याच्या सहा विद्यार्थ्यांची बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जिल्हा क्रीडा परिषद, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे व श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जुन्नर तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धा जुन्नर या ठिकाणी संपन्न झाल्या. या स्पर्धेत चैतन्य विद्यालयाच्या १७ खेळाडू सहभागी झाले होते.यापैकी सहा खेळाडूंची पोदार इंटरनॅशनल स्कूल रोहकल,चाकण या ठिकाणी १० ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झाली. अशी माहिती विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख अमित झरेकर यांनी दिली . सर्व यशस्वी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप मुख्याध्या पक प्रतीक अकोलकर,संजय हिरे,वनिता भोर,बाळासाहेब साबळे यांनी हार्दिकअभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### विषमुक्त अन्नासाठी नैसर्गिक निविष्ठांचा वापर वाढवा : रविंद्र भोर यांचे आवाहन

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : अफार्म पुणे,इंडिगो एअर लाईन्स आणि राष्ट्रीय स्थायी विकास संस्था यांच्या माध्यमातून सीमांत,अल्प भूधारक शेतकरी महिलांना कमी क्षेत्रात विषमुक्त उत्पादन वाढविण्यासाठीजुन्नरतालुक्या तील पिंपरी पेंढार,उंब्रज नं:- १,डुंबरवाडी,खामुंडी आणि ठिकेकरवाडी येथे कृषी व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.जमिनीचे क्षेत्रफळ कमी व वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतीचे अर्थकारण अडचणीत येत असताना नैसर्गिक निविष्ठांचा वापर शेतकऱ्यांसाठी खर्च कमी करण्याचा प्रभावी पर्याय ठरू शकतो. विषमुक्त अन्न उत्पादना साठी रासायनिक निविष्ठांवरी ल अवलंबित्व कमी करून दशपर्णी अर्क,जीवामृत, यांसारख्या नैसर्गिकनिविष्ठांचा वापर वाढवावा,"तसेचपिकांचे विविधिकरण आणि आंतर पीक पद्धतीचे प्रयोग करत उत्पादन वाढ करणे शक्य होईल असे आवाहन कृषी प्रशिक्षक रविंद्र भोर यांनी केले. या नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन केले होते.या वेळी उपस्थित महिलांनी विचारले ल्या अनेक प्रश्नांना उत्तरे देतांना प्रशिक्षक रविंद्र भोर माहिती देत होते. प्रक्षेत्रावर झालेल्या या उपक्रमात दशपर्णी अर्क व जीवामृत निर्मितीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले.नैसर्गिक निविष्ठांची निर्मिती स्वतःच्या शेतावर करण्यावर भर द्यावा, असे आवाहन यावेळी त्यांनी महिला शेतकऱ्यांना केले. दशपर्णी अर्क तयार करण्या साठी कडुनिंब,करंज,पपई गुळवेल,कण्हेरी,रुई,एरंड, टणटणी,सीताफळ व निर्गुडी च्या पानांसह शेण,गोमूत्र, लसूण व मिरचीचा वापर करण्यात यावा जीवामृता साठी शेण,गोमूत्र,गूळ,बेसन पीठ आणि वडाच्या झाडा खालील मातीचा वापर करण्यात येतो शेतीशाळेचे आयोजन (NISD) राष्ट्रीय स्थायी विकास संस्थेचे वरिष्ठ अधिकारी विजयकुमार शिंदे यांनी केले.यावेळी पिंपरी पेंढार,उंब्रज नं१,डुंबरवाडी, खामुंडी व ठिकेकरवाडी येथील ग्रामसंघातील अनेक महिला शेतकरी उपस्थित होत्या.या उपक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी उज्वला देवगिरे शिल्पा हांडे,शितल आरोटे, अर्चना शिंगोटे, आणि रोहिणी ठिकेकर यांनी परिश्रम घेतले.

### विविध बोलींनी हिंदी भाषा समृद्ध होत गेली : डॉ. प्रकाश निहलानी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : भारतातील विविध प्रदेशांमध्ये हिंदी वेगवेगळ्या स्वरूपात बोलली जाते. स्थानिक बोलींमधील अनेक शब्द हिंदीने आत्मसात केल्याने लोकांच्या वापरातून हिंदी भाषा सातत्याने समृद्ध होत गेली, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहिःस्थ शिक्षण विभागाचे संचालक तथा हास्य-व्यंग्य कवी डॉ. प्रकाश निहलानी यांनी केले. नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेजच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने पीपल्स कट्ट्यावर हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विकास सुकाळे होते. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. हिंदी ही भारताची बिंदी आहे, असे सांगत डॉ. निहलानी यांनी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा अभिमान बाळगत हिंदीसह अन्य भारतीय भाषांचाही अभ्यास करावा, असे आवाहन केले. त्यांनी नदी और सागर का मिलाप, डॉक्टर को देखने का समय यांसह हास्य-व्यंग्य रचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. फौजी और अनपढ़ लड़की या सादरीकरणालाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी मराठी माझी आई आहे, तर हिंदी माझी मावशी आहे,असे सांगत सर्व भारतीय भाषांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी हिंदी कविता तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून तयार केलेले गीत सादर केले. प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. हिंदी दिनानिमित्त विद्यार्थिनींनी हिंदीतील प्रथम महिला साहित्यिकांची माहिती देणारे भित्तिपत्रक सादर केले. तसेच सायबर गुन्ह्यांवर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. राजेश्वरी अन्नदाते, ज्योती जोगपेठे व प्रांजली जवळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आम्रपाली कसबे यांच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एन. जाधव यांनी केले. डॉ. माया भालेराव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. आम्रपाली कसबे यांनी तर आभार प्रा. विजय कदम यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास प्रा डॉ. मुकुंद कवडे, प्रा डॉ. सुनिता माळी, प्रा डॉ. पुनम लोहाना, प्रा डॉ. राजेश सोनकांबळे, प्रा. कल्पना जाधव, डॉ. मिर्झा, डॉ. आनंद थोरात, प्रा. पी. पी. चौधरी, प्रा. जी. डी. तडोड, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, प्रा. डॉ. विनायक देव, प्रा. किरण बीचकुंदे, प्रा. आदित्य गोडबोले, डॉ. सुप्रिया गायकवाड, डॉ. वर्षा मोरे, प्रा डॉ. प्रीती यादव तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर-बिलोलीतील शेतकरी संकटात पीक नुकसानीचे पंचनामे करा

## कोरडा दुष्काळ जाहीर करून भरीव मदत द्या : आ. जितेश अंतापूरकर

बिलोली : (स. गांवकरी)



पर्जन्यमानातील घट, खरीप पिकांची सद्यस्थिती आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या तातडीच्या उपाययोजनांबाबत कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील गंभीर कृषी परिस्थितीचा मुद्दा आमदार जितेश अंतापूरकर यांनी आक्रमकपणे मांडत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत देण्याची मागणी केली.

मतदारसंघात पावसाने मोठी ओढ दिल्याने मूग, उडीद, सोयाबीन, कापूस आणि तूर यांसह विविध खरीप पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. बागायती शेतीलाही पावसाच्या तुटवड्याचा मोठा फटका बसला आहे. पिकांना आवश्यक त्या प्रमाणात पाणी न मिळाल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम झाला असून उत्पादन शून्य होण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे मतदारसंघातील पीक परिस्थितीची तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त क्षेत्रांचे पंचनामे करण्याची मागणी केली. पावसाअभावी उद्भवलेल्या परिस्थितीची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि बळीराजाला दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

### बँकांनी खात्यांवरील 'होल्ड' हटवावा

शासनाने पीक विमा कंपन्यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, तसेच दुष्काळामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना बँकांकडून दिला जाणारा नाहक त्रास तातडीने थांबवावा, अशी मागणी आमदार जितेश अंतापूरकर यांनी केली. पीक कर्ज थकीत असल्याचे कारण पुढे करत काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर 'होल्ड' लावण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या खात्यात जमा असलेली वैयक्तिक रक्कमही त्यांना काढता येत नाही. पीक कर्जमाफीच्या प्रक्रियेत संबंधित कर्जाचा समावेश झाला नसला, तरी शेतकऱ्यांची वैयक्तिक रक्कम बँकांनी अडवून ठेवू नये. ही रक्कम तातडीने खातेदारांना उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना बँकांना देण्यात याव्यात, अशी मागणी आमदारांनी केली. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पीक विम्याचे पंचनामे पूर्ण करावेत आणि बँक खात्यांवरील अनावश्यक निर्बंध तात्काळ उठवावेत, असा आग्रह बैठकीत धरण्यात आला.

# दुःखाच्या प्रसंगी पेरकेवार कुटुंबाच्या पाठीशी भाऊराव मोरे

नायगाव : (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील नरशी येथील प्रजावाणीचे पत्रकार सुभाष पेरकेवार यांचे निधनानंतर सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीच्या जबाबदाऱ्यांपासून नव्हे, नायगाव तालुक्यातील ज्येष्ठ ग्रामस्थ भाऊराव मोरे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. नरसी येथील पत्रकार सुभाष पेरकेवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या दुःखाच्या प्रसंगी मोरे यांनी पेरकेवार कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत आधार दिला. पत्रकार सुभाष पेरकेवार यांच्या अचानक निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घरातील कर्त्या व्यक्तीच्या अकाली जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे अशक्य असताना, अशा कठीण प्रसंगी सांत्वनाच्या शब्दांपेक्षा प्रत्यक्ष मदतीचा हात अधिक महत्त्वाचा ठरतो. हीच जाणीव ठेवून भाऊराव मोरे यांनी पेरकेवार कुटुंबाला आधार देण्यासाठी पुढाकार घेतला. दुःखाच्या प्रसंगी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि 'तुम्ही एकटे नाही' असा विश्वास निर्माण करणे, हीच खरी सामाजिक संवेदनशीलता आहे. मोरे यांनी दाखविलेल्या या आपुलकीमुळे पेरकेवार कुटुंबाला मानसिक आधार मिळाला. आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थप्रधान वातावरणात दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होऊन त्याला आधार देणारी माणसे कमी होत असताना भाऊराव मोरे यांच्यासारखी संवेदनशील व्यक्तिमत्त्वे समाजातील माणुसकीची ज्योत तेवत ठेवण्याचे काम करीत आहेत.

# संतप्त ग्रामस्थांचा वीज वितरण कार्यालयात ठिय्या

बिलोली : (स. गांवकरी)



■ अभियंत्याला घेराव घालताच वीजपुरवठा सुरळीत

कोणतीही तांत्रिक किंवा नैसर्गिक अडचण नसताना बिलोली तालुक्यातील कार्ला, बावलगाव आणि बाभळी परिसराचा वीजपुरवठा गेल्या काही दिवसांपासून रात्रभर खंडित होत होता. या मनमानी कारभाराला कंटाळून अखेर शनिवारी रात्री संतप्त झालेल्या सुमारे तीनशे ग्रामस्थांनी अर्जापूर येथील वीज उपकेंद्रावर (सबस्टेशन) धडक देत ठिय्या आंदोलन केले. ग्रामस्थांनी अभियंत्याला घेराव घालून जाब विचारताच काही वेळातच वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. अर्जापूर उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या कार्ला बु., कार्ला खु. आबादी, बावलगाव आणि बाभळी या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून दररोज रात्रीच्या वेळी वीज गायब होत होती. सध्या पावसाळ्यातील नैसर्गिक अडचण नसतानाही एकदा गेलेली वीज रात्रभर येत नव्हती. सध्या गणेशोत्सवाचे दिवस असल्याने वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे नागरिकांचा आणि भाविकांचा मोठा हिरमोड होत होता. या त्रासाने ग्रामस्थ अक्षरशः त्रस्त झाले होते. या समस्येबाबत महावितरण कार्यालय, लाईनमन अथवा संबंधित अभियंत्यांना वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तरी कोणीही फोन उचलत नव्हते; फोन उचलल्यास समाधानकारक उत्तरे मिळत नव्हती. शनिवारी रात्री पुन्हा वीज गुल झाल्याने ग्रामस्थांच्या संयमाचा बांध फुटला. परिसरातील सुमारे तीनशे नागरिक रात्रीच अर्जापूर येथील वीज वितरण कार्यालयावर चालून गेले. उपस्थित ऑपरेटरला जाब विचारत ग्रामस्थांनी कार्यालय डोक्यावर घेतले. दरम्यान, सहायक अभियंता चंद्रवंशी यांनी परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला; मात्र संतप्त ग्रामस्थांनी त्यांना घेराव घालून प्रश्नांची सरबत्ती केली. अखेर ग्रामस्थांचा आक्रमक पवित्रा पाहून खासगी तंत्रज्ञांच्या मदतीने तातडीने दुरुस्ती करत काही वेळातच वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

# कल्याण-लातूर महामार्गाला विरोध; जुन्नर तालुक्यात आंदोलन तीव्र

## बनकरफाटा येथे पाचव्या दिवशीही धरणे आंदोलन सुरू; भजनातून 'जमिनी वाचवा'चा संदेश



शिवनेरी : (स. गांवकरी)

लातूर-कल्याण जनकल्याण महामार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतजमिनी, घरे आणि गावांचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी जुन्नर तालुक्यातील बनकरफाटा येथे सुरू असलेल्या धरणे आंदोलनाचा रविवारी (दि. २० सप्टेंबर) पाचवा दिवस होता. आंदोलनाला तालुक्यातील विविध गावांसह मुंबई व पुणे येथूनही पाठिंबा मिळत असून, दिवसेंदिवस आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट, उपाध्यक्ष भगवान घोलप, कार्याध्यक्ष सूरज वाजगे, सचिव पंकज हांडे, स्वप्निल अहिनवे तसेच धरणे आंदोलन कृती समिती, जुन्नर तालुका यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. महामार्गामुळे बाधित होणाऱ्या २५ गावांतील तसेच वाड्या-वस्त्यांतील ग्रामस्थ नियोजनानुसार दररोज बनकरफाटा येथे एकत्र येत आंदोलनात सहभागी होत आहेत. या आंदोलनाला शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सचिन थोरवे, रंजना अहिनवे, महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सोमनाथ पाबळे, शैला जाधव, मीरा काळे, सुयाशा डुंबरे, शोभा डुंबरे, भास्कर डुंबरे यांच्यासह अनेक बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनातून शासनाने बाधित ग्रामस्थांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. शासनाने या प्रश्नाची दखल घेतली नाही, तर आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धारही उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केला. तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांचा आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. बापू कुमकर, पंकज हांडे, राजू सुकाळे, सुभाष घोलप, विशाल सस्ते यांच्यासह विविध स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी संघटनांचे पदाधिकारी आंदोलनस्थळी उपस्थित राहून आंदोलकांना पाठिंबा देत आहेत.

बाधित गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होत असून, भजनाच्या माध्यमातून शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन पुढे नेले जात आहे. शेतजमिनी व हक्कांचे संरक्षण व्हावे आणि बाधित ग्रामस्थांच्या मागण्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

### भजनातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

आंदोलनस्थळी दररोज रात्रीपासून पहाटेपर्यंत ग्रामस्थांकडून हरिभजनाचे आयोजन करण्यात येत आहे. विविध पारंपरिक भजने आणि गौळणींच्या माध्यमातून महामार्गाला विरोध नोंदवत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे. भजनाच्या प्रत्येक सुरातून 'आमचा प्रश्न ऐका, आमच्या जमिनी वाचवा' अशी भावना व्यक्त होत आहे.

# शाळेच्या वसतिगृहातून तीन शाळकरी मुले गायब



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जुन्नरमधील कृष्णराव मुंढे विद्यालयाच्या वसतिगृहा मधील तीन अल्पवयीन मुलां ना अनोळखी इसमाने या मुलां च्या अज्ञानाचा फायदा घेत त्यांना फूस लावून पळवले असे मानले जाते किंवा या मुलांना कोणी अज्ञात व्यक्तीने गायब केल्याची घटना ३१ ऑगस्ट रोजी घडलेली असून याबाबतची फिर्याद मुलांच्या पालकांनी जुन्नर पोलीस स्टेशन मध्ये उशिराने नोंद केली आहे. ओंकार नामदेव माळी, सौरव दत्तू डामसे,ज्ञानेश्वर बुधा दाभाडे सर्व रा:-कोपरे मांडवे, ता:-जुन्नर अशी या शाळकरी मुलांची नावे आहेत. हे सर्वजण कृष्णराव मुंढे विद्यालयाच्या वसतिगृहामध्ये राहून शिक्षण घेतात.या तिघांना अनोळखी इसमाने ती अल्पवयीन आहेत हे माहीत असताना सुद्धा त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत फूस लावून पळून नेले.मुलांच्या पालकांनी शोध घेऊनही ती मिळून आलेली नाहीत दि:- ३१ ऑगस्ट रोजी सकाळी सदर घटना घडली होती नामदेव माळी या पालकाने जुन्नर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंद केली आहे. पोलिसांनी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल केला असून या तीन अपहरित मुलांबाबत अधिक माहिती असल्यास जुन्नर पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचेआवाहन करण्यात आले आहे.पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप मोरे करीत आहेत दरम्यान या गायब मुलांच्या पालकांनी व मांडवी नदी उगम खोरे मधील समाज बांधव यांनी कोपरे गावातील मिसिंग मुले यांच्या शोध मोहीमसाठी जे काही प्रयत्न चालू आहेत यावेळी पुणे जिल्हा परिषद सदस्या सोनाबाई दाभाडे,सरपंच रोहिणी माळी,बिरसा ब्रिगेड तालुका अध्यक्ष राजु मुठे, माजी सरपंच भीमराव मुठे, महादू माळी,पोलीस पाटील ज्ञानदेव कवटे,काळू माळी दत्तू मुठे फौजी माळी आणि सगळेच समाज बांधव मुलांचे पालक यांनी बाजू मांडली. मुले शोधून पत्रकार आणि आदिवासी कार्यकर्ते संजय साबळे यांनी सहकार्य करत आहेत. अनेक ग्रामस्थांनी शाळेत जाऊन संस्थेच्या अध्यक्ष,मुख्याध्यापक यांची भेट घेऊन वसतिगृह अधीक्षक यांच्या हलगर्जीपणा बद्दल त्यांच्यावर कारवाई करावी अन्यथा शाळेला टाळे लावले जाईल असा इशारा दिला आहे.अपहरणाच्या या घटने मुळे मात्र जुन्नर परिसरा तील पालक आणि शालेय विद्यार्थी यांच्यामध्ये घबराटीचे वातावर ण असून,एकाच वेळी तीन मुलांचे अपहरण झाल्याने खळबळ उडाली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९